चौकशी अधिका-याची नेमणूक करणेबाबत
श्री.अतिष दादासाहेब आखाडे से.नि.ग्रामसेवक
ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा
यांचे गैरर्वतना बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ १७८ /२०२४
अहमदनगर, दिनांक १५ / ०४/२०२४

**संदर्भ** :-१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/५०३/२०२३ दिनांक १३/०४/२०२३

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र /ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३७८/२०२३, दिनांक- २२/०५/२०२३

३. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रांप-३/३७६/२०२३ दिनांक २२/०५/२०२३(सेवानिलंबन)

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

५. श्री.आखाडे ग्रामसेवक यांचा खुलासा दिनांक ०५/०२/२०२४

ज्या अर्थी, श्री.अतिष दादासाहेब आखाडे सेवानिलंबित तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा येथे कार्यरत असताना ग्रामपंचायत कामकाजात गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये, गट दोषारोप प्राप्त झालेले आहेत. संदर्भ क्र. २ नुसार तयार करण्यात आलेले दोषारोप पत्र आरोप क्रमांक १ ते ०६ श्री.अतिष दादासाहेब आखाडे ग्रामसेवक, यांना दिनांक १९/०१/२०२४ रोजी बजावले असून त्यांनी दोषारोपांबाबत खुलासा सादर केलेला आहे तथापी सर्व आरोप अमान्य असल्याचे खुलाश्यामध्ये नमुद केलेले आहे. सबब, त्यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.अतिष दादासाहेब आखाडे, सेवानिलंबीत ग्रामसेवक, यांचे विरुध्द संदर्भ क्र.४ मध्ये नमुद केलंनुसार चौकशी करणे कामी सहा.आयुक्त, (चौकशी),विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

मी,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करुन श्री.अतिष दादासाहेब आखाडे से.नि.ग्रामसेवक ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. या विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या

Scanned with OKEN Scanner

नियमातील तरतुदी लागू राहतील. नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यास संदर्भ क्र.४ मधील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202404150600066 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

सहा. आयुक्त, (चौकशी),विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत श्री.अतिष दादासाहेब आखाडे सेवानिलंबित तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचीका पृष्ठ क्र. १ ते जोडले आहे. सदर गैरव्यवहार /गैरवर्तनाची चौकशी करुन अहवाल सादर करावा.

प्रत :- श्री.अतिष दादासाहेब आखाडे सेवानिलंबित तत्कालीन ग्रामसेवक श्रीगोंदा मुख्यालय अकोले

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/- सोबतचा आदेश श्री.अतिष दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक, यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- श्री.मोहसीन अस्लम मालजप्ते,विस्तार अधिकारी,(सांख्यिकी) पंचायत समिती श्रीगोंदा

व्दारा – गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत- गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner